# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक:10/एआयसीटीई/पदविका/नवीन संस्था/मान्यता/2015/५७८
दिनांक :

24 JUN 2015

प्रति,
प्राचार्य,
आदर्श बहुउद्देश शिक्षण प्रसारक मंडळाचे,
डॉ. आर.एन. लाहोटी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, सुलतानपूर,
जालना रोड, सुलतानपूर, ता. लोणार,
जि. बुलढाणा-443307.

[1279]

विषय : शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची तंत्रनिकेतनाची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देणेबाबत...

संदर्भ : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : मान्यता-2015/(65/15)/तांशि-5, दि. 25.5.2015.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था खालील अभ्यासक्रमांसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कोड | अभ्यासक्रमाचा प्रकार | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|---|
| 1. | डिप्लोमा फार्मसी | PH | रेग्युलर फर्स्ट शिफ्ट | 60 |

आपण संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व आदर्श बहुउद्देश शिक्षण प्रसारक मंडळ, यांच्या संयुक्त खात्यात वरील अभ्यासक्रमासाठी एकुण रुपये 7.50 लाख, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा सुलतानपूर, जि. बुलढाणा, येथे पावती क्रमांक 074731, दिनांक 6.6.2015, अन्वये 10 वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेल्या अभ्यासक्रमास / संस्थेस सन 2015-16 पासून विना अनुदान तत्वावर त्यापुढे दर्शविलेली प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास व शासन मान्यतेस अनुसरुन संदर्भिय शासन निर्णयात नमूद अटींच्या अधिन राहून या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

1. सदर अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
2. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.
3. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.
4. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : टिईएम 3382/111836/(190)/तांशि-1(अ), दिनांक 21 मे 1983 अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.
5. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.
6. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले प्रवेश नियम, प्रवेश पध्दती, आरक्षण, शिक्षण शुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana

Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana

7. संस्थेने अभ्यासक्रम कालविन्यास पूर्णवेळ, प्रचलित सेवा नियमानुसार अर्हता धारण करीत असलेला शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

8. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

9. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांच्याकडून घेतल्या जातील.

10. शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संस्थेने आकारल्यास संस्थेवर महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्यूशन (प्रोव्हीबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ऍक्ट 1987 नुसार कारवाई करण्यात येईल.

11. रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ऍक्ट, 1999 यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

12. संचालक किंवा या संचालनालयाचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याचा अधिकार राहील.

13. शासन किंवा या संचालनालयाने किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी यांस संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेत आढळून येणाऱ्या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

14. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

15. संस्थेतील कर्मचारी व शिक्षकांचे मासिक वेतन संस्थेच्या नजिक असलेल्या बँकमार्फतच करावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर:-

1. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.
2. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
3. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.
4. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर.
5. प्रणाली व्यवस्थापक, कार्यासन क्रमांक 3(आयटी सेल), मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
6. निवड नस्ती.